नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २५७ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## महिला आशिया कप २०२६: भारताची सलामीची लढत थायलंडशी

दुबई/नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

भारतीय महिला क्रिकेट संघ थायलंडविरुद्ध महिला आशिया कप टी–२० स्पर्धेत आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. गेल्या दशकात भारताने आशिया कपवर वर्चस्व गाजवले आहे, पण यावेळी संघापुढील सर्वात मोठे आव्हान आपला फॉर्म आणि कामगिरी पुन्हा मिळवणे हे असेल. २०१६–१७ पासून खेळल्या गेलेल्या पाच स्पर्धांमध्ये भारताने तीन वेळा टी–२० आशिया कप जिंकला आहे. मात्र, संघाचा सध्याचा फॉर्म चिंतेचा विषय आहे. यावर्षी खेळल्या गेलेल्या १६ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपैकी भारताला नऊ सामन्यांत पराभव पत्करावा लागला आहे. टी–२० विश्वचषकात ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या मागील पराभवामुळे भारताची मोहीम गट टप्प्यातच संपुष्टात आली होती. आता, आशिया कपमध्ये चांगली कामगिरी करून संघ पुन्हा एकदा लय मिळवण्याचा प्रयत्न करेल.

कर्णधार हरमनप्रीत कौरसाठी वैयक्तिक पातळीवरही महत्त्वाची आहे. तिच्या फॉर्म आणि टी–२० क्रिकेटमधील भविष्याबद्दल प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या महत्त्वपूर्ण विश्वचषक सामन्यात तिने एक निर्णायक खेळी खेळली असली तरी, संपूर्ण स्पर्धेत तिच्या कामगिरीतील सातत्याचा अभाव हा चर्चेचा विषय होता. आशिया कपनंतर पुढील महिन्यात होणाऱ्या आशियाई खेळांच्या आव्हानाला भारताला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे, संघ व्यवस्थापनाला कर्णधारासह प्रमुख क्रिकेटपटूंनी स्पर्धेसाठी आपला सर्वोत्तम फॉर्म परत मिळवावा अशी अपेक्षा असेल.

# डॉ. चित्तरंजन पुरंदरे यांचे वैद्यकीय क्षेत्रातील योगदान प्रेरणादायी : मंत्री छगन भुजबळ

### प्रा. डॉ. पुरंदरे यांचा गौरव सोहळा व 'हँड्स दॅट हील्ड, अ हार्ट दॅट लेड' आत्मचरित्राचे प्रकाशन

मुंबई (समर्थ गांवकरी)

वैद्यकीय क्षेत्रात पाच दशकांहून अधिक काळ निःस्वार्थ सेवा बजावताना हजारो रुग्णांचे प्राण वाचविणारे, हजारो विद्यार्थ्यांना घडविणारे आणि वैद्यकीय संशोधनाला नवी दिशा देणारे डॉ. चित्तरंजन पुरंदरे यांचे कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्यातीप्राप्त आहे. महिला आरोग्य आणि प्रसूतीशास्त्राच्या क्षेत्रात त्यांनी केलेले विशेष कार्य, संशोधन आणि अध्यापन यामुळे वैद्यकीय क्षेत्राची प्रतिष्ठा उंचावली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित सत्कार सोहळा आणि त्यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन हा अभिमानाचा क्षण असल्याचे गौरवोद्गार अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी काढले.

महिलांच्या आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय सेवा बजावणारे प्रा. डॉ. सी. एन. पुरंदरे यांचा कार्य गौरव सोहळा मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झाला. कार्यक्रमास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर व डॉ. पुरंदरे यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

मंत्री छगन भुजबळ म्हणाले, डॉ. पुरंदरे हे केवळ उत्कृष्ट चिकित्सक नसून शिक्षक आणि संशोधक म्हणूनही त्यांनी भरीव योगदान दिले आहे. आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये त्यांचे १४० हून अधिक संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. आत्मचरित्र म्हणजे केवळ कामांची यादी नसून एका काळाचा इतिहास असतो. ज्ञान, संशोधन आणि कौशल्यांचा उपयोग समाजसेवेसाठी झाला पाहिजे, असा प्रेरणादायी संदेश देणारा डॉ. पुरंदरे यांचा जीवनप्रवास तरुणांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे मंत्री भुजबळ म्हणाले.

प्रा. डॉ. पुरंदरे यांनी वैद्यकीय क्षेत्रात केलेले कार्य हे केवळ उपचारांपुरते मर्यादित नसून, महिला आरोग्याबाबत समाजात जागरूकता निर्माण करणारे असल्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि सेवाभावी वृत्तीचा लाभ असंख्य रुग्णांना झाला असून, नव्या पिढीतील वैद्यकीय विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.




मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले डॉ. पुरंदरे यांनी त्यांच्या कामातून जगभरात ओळख निर्माण केली. त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांच्या जीवनाचे विविध पैलू समोर येतील असे सांगत त्यांनी पुरंदरे कुटुंबाशी असलेल्या ऋणानुबंधांना उजाळा दिला.

### संक्षिप्त

## नेपाळ–तिबेट पूरस्थितीत महाराष्ट्रातील ४०४ नागरिक अडकले

### ३३८ जणांशी संपर्क

रायगड (समर्थ गांवकरी)

नेपाळ–तिबेट परिसरात २६ ऑगस्ट रोजी आलेल्या भीषण पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, महाराष्ट्रातील ४०४ नागरिक या भागात अडकले आहेत. २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजेपर्यंत यापैकी ३३८ नागरिकांशी संपर्क प्रस्थापित झाला असून ते सुरक्षित असल्याची माहिती महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली आहे. अडकलेल्या नागरिकांपैकी ६० जण 'रिचा टूर्स प्रा. लि.' या संस्थेमार्फत प्रवासाला गेले होते. या गटाशी अद्याप थेट संपर्क होऊ शकलेला नाही. तसेच अन्य सहा नागरिकांची माहिती वेब लिंकद्वारे प्राप्त झाली असून, त्यांच्याशीही संपर्क साधता आलेला नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.



# अग्निवीरांसाठी महाराष्ट्रात रोजगाराचे नवे दार खुले!

## पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश; महाराष्ट्र शासनाकडून १,००० अधिसंख्य पदांना मंजुरी

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

भारतीय सशस्त्र दलात चार वर्षे देशसेवा करून सेवामुक्त होणाऱ्या अग्निवीरांच्या भवितव्यासाठी पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला मोठे आणि ठोस यश मिळाले आहे. अग्निवीरांना महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, माजी अग्निवीरांच्या पुनर्नियुक्तीसाठी १,००० अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

देशासाठी चार वर्षे गणवेश परिधान करून सेवा करणाऱ्या अग्निवीरांच्या शिस्तीचा, नेतृत्वगुणांचा, तांत्रिक कौशल्यांचा आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाचा महाराष्ट्राच्या प्रशासनाला उपयोग व्हावा, ही भूमिका पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी सातत्याने मांडली होती. त्यांच्या या दूरदृष्टीपूर्ण भूमिकेला आता शासन निर्णयाच्या माध्यमातून संस्थात्मक स्वरूप मिळाले आहे.

११ जून २०२५ रोजीच डॉ. पोपटराव पवार यांनी मांडला होता ठोस प्रस्ताव

अग्निवीरांच्या भवितव्याचा प्रश्न पुढे नेत पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी दि. ११ जून २०२५ रोजी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले होते. चार वर्षांची लष्करी सेवा पूर्ण केल्यानंतर अग्निवीरांना महाराष्ट्र शासनाच्या विविध सेवांमध्ये संधी मिळावी, अशी मागणी त्यांनी या निवेदनातून केली होती.

अग्निवीरांना लष्करी सेवेदरम्यान मिळणारे प्रशिक्षण, शिस्त, नेतृत्व, सुरक्षा कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि आपत्ती व्यवस्थापनाचा अनुभव राज्याच्या विविध सेवांसाठी उपयुक्त ठरू शकतो, असा ठाम युक्तिवाद डॉ. पोपटराव पवार यांनी केला होता.

माजी सैनिकांना महाराष्ट्र शासनाच्या विविध सेवांमध्ये १५ टक्के आरक्षण दिले जाते, याचा संदर्भ देत अग्निवीरांसाठीही ५ ते १० टक्के आरक्षणाचा विचार करावा, अशी मागणी डॉ. पवार यांनी केली होती. उत्तर प्रदेश सरकारने अग्निवीरांसाठी २० टक्के आरक्षणाची घोषणा केल्याचा संदर्भही त्यांनी आपल्या निवेदनात दिला होता.

डॉ. पोपटराव पवार यांच्या पाठपुराव्याला शासन निर्णयाची जोड

डॉ. पोपटराव पवार यांनी मांडलेल्या या विषयाचा सातत्याने पाठपुरावा होत राहिला. त्यातूनच आता महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी शासन निर्णय जारी करून १,००० अधिसंख्य पदांना मंजुरी दिली आहे.

या निर्णयानुसार माजी अग्निवीरांना महाराष्ट्र शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त गणवेशधारी गट–क संवर्गात तसेच अन्य शासकीय व निमशासकीय आस्थापनांमध्ये पुनर्नियुक्ती देण्यासाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात येणार आहेत.

या निर्णयामागे पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी अग्निवीरांच्या प्रश्नाकडे पाहिलेली व्यापक राष्ट्रहिताची दृष्टी महत्त्वाची ठरली आहे.

उच्चस्तरीय समिती स्थापन; पुढील कार्यवाहीला वेग

शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समिती स्थापन करण्यात आली आहे. गृह, वन, सामान्य प्रशासन, वित्त, नगरविकास तसेच विधी व न्याय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा या समितीत समावेश आहे.

ही समिती विभागनिहाय व संवर्गनिहाय पदे निश्चित करणे, नियुक्तीची कार्यपद्धती ठरवणे आणि माजी अग्निवीरांना नियमित शासकीय/निमशासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी आवश्यक कार्यपद्धती सुचविण्याचे काम करणार आहे.

पोलीस, वन, अग्निशमनसह विविध क्षेत्रांत संधी

शासन निर्णयात संभाव्य संधी म्हणून पोलीस शिपाई, चालक पोलीस शिपाई, कारागृह पोलीस/रक्षक, अग्निशामक/बचावकर्ता, राज्य उत्पादन शुल्क विभागातील जवान व वाहनचालक, वनरक्षक तसेच महानगरपालिका आणि नगरपालिकांमधील अग्निशामक अशा विविध गणवेशधारी पदांचा उल्लेख करण्यात आला आहे.

या सर्व क्षेत्रांसाठी अग्निवीरांना मिळालेले लष्करी प्रशिक्षण, शिस्त, शारीरिक क्षमता, नेतृत्वगुण, सुरक्षा कौशल्य आणि आपत्ती व्यवस्थापनाचा अनुभव अत्यंत उपयुक्त ठरू शकतो.

याच मुद्द्यावर पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी आपल्या निवेदनातून विशेष भर दिला होता.

'गणवेश बदलला तरी राष्ट्रसेवा थांबत नाही' – डॉ. पवार यांच्या भूमिकेला यश

अग्निवीरांचा प्रश्न हा केवळ रोजगाराचा प्रश्न नसून, देशासाठी चार वर्षे सेवा केलेल्या तरुणांच्या कौशल्याचा राज्याच्या विकासासाठी उपयोग करून घेण्याचा विषय आहे, अशी व्यापक भूमिका डॉ. पोपटराव पवार यांनी मांडली होती.

डॉ. पवार यांच्या या भूमिकेमुळे अग्निवीरांकडे केवळ सेवामुक्त युवक म्हणून न पाहता प्रशिक्षित, शिस्तबद्ध आणि राष्ट्रसेवेचा अनुभव असलेली मनुष्यबळाची ताकद म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन पुढे आला.

हिवरे बाजारसारख्या ग्रामीण विकासाच्या प्रयोगातून देशपातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी अग्निवीरांच्या भवितव्याचा विषयही सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रहिताच्या भूमिकेतून पुढे नेला.

त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेले निवेदन, त्यानंतरचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि अग्निवीरांना राज्यसेवेत संधी देण्याची मांडलेली भूमिका यामुळे आजच्या शासन निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

१,००० पदे म्हणजे सुरुवात; पुढील संधींची अपेक्षा

१,००० अधिसंख्य पदांची मंजुरी हा अग्निवीरांच्या महाराष्ट्रातील पुनर्वसन प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून पुढील काळात विभाग व संवर्गनिहाय पदे आणि नियुक्तीची कार्यपद्धती निश्चित होणार आहे.

महत्त्वाचे म्हणजे, दि. २७ ऑगस्ट २०२६ च्या शासन निर्णयात अग्निवीरांसाठी ५ टक्के किंवा १० टक्के आरक्षण अंतिम करण्यात आलेले नाही. डॉ. पोपटराव पवार यांनी आरक्षणाचा विचार करण्याची मागणी केली होती; मात्र सध्याच्या निर्णयानुसार १,००० अधिसंख्य पदांना मंजुरी देऊन पुढील प्रक्रिया उच्चस्तरीय समितीकडे सोपविण्यात आली आहे.

त्यामुळे हा निर्णय डॉ. पोपटराव पवार यांच्या मागणीच्या दिशेने झालेला ठोस धोरणात्मक टप्पा म्हणून पाहिला जात आहे.




सैनिक समाजातून डॉ. पोपटराव पवार यांचे अभिनंदन

महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयामुळे माजी सैनिक, सैनिक परिवार, अग्निवीर, युवक आणि विविध सामाजिक संस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांच्या दूरदृष्टीचे, राष्ट्रनिष्ठेचे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

अग्निवीरांच्या भवितव्यासाठी प्रश्न उपस्थित करून थांबून न जाता, त्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करणारे डॉ. पोपटराव पवार यांचे प्रयत्न आता निर्णयाच्या रूपाने पुढे आले आहेत.

चार वर्षे देशासाठी घाम गाळलेल्या अग्निवीरांच्या कौशल्याला महाराष्ट्राच्या सेवेत वापरण्याचा मार्ग खुला करण्यासाठी डॉ. पोपटराव पवार यांनी सुरू केलेल्या प्रयत्नांना मिळालेले हे यश हजारो तरुणांसाठी आशेचा किरण ठरणार आहे.

देशसेवा संपत नाही; गणवेश बदलतो, पण राष्ट्रसेवेची भावना कायम राहते.

या भावनेतून पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी अग्निवीरांच्या भवितव्यासाठी उचललेले पाऊल आता महाराष्ट्राच्या विकासासाठी प्रशिक्षित, शिस्तबद्ध आणि राष्ट्रनिष्ठ तरुणशक्ती उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी सात वर्षे योगदान; मनोज कोल्हे यांची साताऱ्यात पदोन्नती

**मंचर (समर्थ गांवकरी)**



आंबेगाव तालुका पंचायत समितीच्या कृषी विभागात कृषी अधिकारी म्हणून मनोज कोल्हे यांनी सात वर्षे उल्लेखनीय काम केल्याबद्दल त्यांची साताऱ्यात पदोन्नती झाली आहे.

मनोज कोल्हे यांच्या कार्यकाळात तालुक्यातील शेतकऱ्यांना विविध कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासोबतच शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादनवाढ आणि शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी मार्गदर्शन मेळावे घेण्यात आले.शेतकऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यावर मार्गदर्शन करणे, यावर कोल्हे यांनी विशेष भर दिला. पंचायत समितीच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यामुळे शेतकरी व कृषी विभाग यांच्यातील सम न्वय अधिक बळकट झाला.मनोज कोल्हे यांची पदोन्नती होऊन जिल्हा परिषद, सातारा येथे सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांच्या पदोन्नतीबद्दल आंबेगाव तालुक्यातील शेतकरी, सहकारी कर्मचारी व विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून, नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# हजरत मोहम्मद पैंगबर यांच्या जन्मदिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न

## तब्बल १२२ सर्वधर्मीय रक्त दात्यांनी अमुल्य रक्तदान करून सामाजिक एकतेचा दिला संदेश

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

मुस्लिम धर्मियांचे नबी रसूल हजरत मोहम्मद पैंगबर यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मोफत दंत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल १२२ सर्वधर्मीय रक्त दात्यांनी आपले अमुल्य रक्तदान करून सामाजिक एकतेचा संदेश दिला. यावेळी प्रमुख उपस्थितांनी प्रेषित मोहम्मद पैंगबर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत मानवता, समानता आणि विश्वकल्याणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

यावेळी मौलाना खलील कासमी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, प्रेषित मोहम्मद रसूल यांनी विश्वातील मानवजातीचा विचार करून सर्वांना समानतेची वागणूक देण्याची शिकवण दिली. हजारो वर्षांत एखादा नेता प्रेषित मोहम्मद रसूल यांच्यासारखा जन्माला येतो. विज्ञानवादी आणि दूरदृष्टीचा विचार ठेवून समाजाला योग्य दिशा देत त्यांनी विश्वकल्याणाचे कार्य केले आहे. त्याचाच आदर्श घेऊन समाजातील तरुणांनी कार्य केले पाहिजे.

यावेळी ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विश्वातील सर्व लोकांना जीवनाच्या योग्य मार्गावर नेण्याचा मार्ग मोहम्मद पैंगबरांनी दाखविला. मानवाला जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची गरज ओळखून त्या समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी संपूर्ण मानवजातीला मानवतेचा संदेश दिला. आजच्या काळातही प्रेषित मोहम्मद पैंगबर यांच्या विचारांचे महत्त्व कायम असून, समाजातील प्रत्येकाने मानवता, बंधुता आणि सेवाभाव जपला पाहिजे, असेही त्यांनी नमूद




केले. सोहेल बागवान यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविल्याबद्दल प्रा. मधुकर राळेभात यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी प्रहार संघटनेचे अध्यक्ष नय्युम सुभेदार व मुस्लिम पंच कमिटीचे अध्यक्ष अजहर काझी यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केल्याबद्दल सोहेल बागवान यांचे कौतुक करत पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जामखेड रजिस्टर कार्यालयात शेतकरी, नागरिकांची आर्थिक लूट?

**जामखेड रजिस्टर कार्यालय हे नागरिकांच्या सोयीसाठी आहे की अतिरिक्त पैसे वसूल करण्याचे केंद्र ?**
**जामखेड रजिस्टर कार्यालयात एजंटांचा सुळसुळाट; नागरिकांच्या कामांसाठी मध्यस्थांची गर्दी**

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड येथील दुय्यम निबंधक (रजिस्टर) कार्यालयात दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांकडून कथितरीत्या अवाजवी रकमेची मागणी केली जात असल्याचा आरोप अँड महारुद्र नागरगोजे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून आपली भूमिका मांडत कार्यालयाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. गुंठेवारीशी संबंधित कागदपत्रांवरून खरेदीखत नोंदणी करताना ५ हजार रुपये अतिरिक्त रक्कम मागितली जाते आणि ती रक्कम दिल्याशिवाय खरेदीखत होत नाही, असा आरोप ड. नागरगोजे यांनी केला आहे. तसेच काही कामांसाठी एजंटांच्या माध्यमातून पैसे गोळा केले जात असल्याचाही त्यांनी दावा केला आहे.याशिवाय, हक्कसोडपत्रासाठी आवश्यक स्टॅम्प व इतर शासकीय शुल्क तुलनेने कमी असताना प्रत्यक्ष कामासाठी मोठ्या रकमेची मागणी केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. हक्कसोडपत्र करण्यासाठी २१ हजार रुपये खर्च येतो, अन्यथा १५ हजार रुपये द्या, काम करून देतो, असे सांगितले जात असल्याचा दावा ड. नागरगोजे यांनी केला आहे.




शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाकडून वेतन मिळत असतानाही नागरिकांकडून अशा प्रकारे अतिरिक्त रकमेची मागणी होत असेल, तर याची सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, या सर्व आरोपांची संबंधित विभागाने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, तसेच नागरिकांकडून कोणत्याही प्रकारे अनधिकृत रक्कम घेतली जात असल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

रजिस्टर कार्यालय हे नागरिकांच्या सोयीसाठी आहे की अतिरिक्त पैसे वसूल करण्याचे केंद्र?, असा सवालही अ‍ॅड. महारुद्र नागरगोजे यांनी उपस्थित केला आहे.

# मुंबईत भटके विमुक्त परिषद व सन्मान सोहळ्याचे आयोजन

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भटके विमुक्त जाती जमाती (VJNT) सेलच्या वतीने ५४ वा भटके विमुक्त दिनानिमित्त भटके विमुक्त परिषद व सन्मान सोहळा सोमवार दि ३१ ऑगस्ट २०२६ ला मुंबईत आयोजित केला असल्याची माहीती स्वागताध्यक्ष तथा भटके विमुक्त जाती जमाती (VJNT) सेल. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रविकांत राठोड यांनी दिली.

सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ सकाळी ११.०० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर, मंत्रालयासमोर, नरिमन पॉईट, मुंबई येथे हा सोहळा पार पडणार आहे.

रा.काँ.पा. च्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री,ना. सुनेत्राताई अजितदादा पवार या कार्यक्रमाच्या उद्घाटक तथा प्रमुख मार्गदर्शक आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे



यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे

# आदर्श शेतकरी,सामाजिक कार्यकर्ते स्व.सुरेश काका पिपाडा यांच्या स्मृतीस अभिवादन

**राहाता (समर्थ गांवकरी)**

आज काका आपल्यात नसले तरी त्यांनी जपलेली माणुसकी, सामाजिक बांधिलकी आणि नात्यांची ऊब पुढील पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील, अशी भावना भाजपाचे नेते डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी सामाजिक कार्यकर्ते व आदर्श शेतकरी स्व.सुरेश(काका) पिपाडा यांच्या स्मृतीदिनानिमित्त बोलताना व्यक्त केले. प्रितम पिपाडा व शितल पिपाडा यांनी आयोजित केलेल्या स्व.सुरेशकाका पिपाडा यांच्या पुण्यस्मरण कार्यक्रम प्रसंगी डॉ.पिपाडा बोलत होते. यावेळी प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ.ममता पिपाडा, कार्यक्रमाचे आयोजक शैलेजा पिपाडा,लिलाबाई पिपाडा,आशा पिपाडा,प्रितम पिपाडा,शितल पिपाडा,संघपती अनिलजी पिपाडा, मदनलाल पिपाडा,नरेंद्र पिपाडा,प्रितिमा पिपाडा,रेशमा पिपाडा, महावीर पिपाडा,सुभाष पिपाडा,अभय पिपाडा,धिरज पिपाडा,पंकज पिपाडा,महेंद्र पिपाडा,निखील पिपाडा,साहिल पिपाडा, अमित पिपाडा आदी उपस्थित होते.

रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधत राहाता येथील आदर्श शेतकरी व सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेले स्वर्गीय सुरेश (काका) पिपाडा यांचा स्मृतीदिन भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी पिपाडा परिवारासह मित्रपरिवार व हितचिंतकांनी स्व. सुरेश काका यांच्या स्मृतींना अभिवादन केले. यावेळी संघपती अनिल पिपाडा,व डॉ.मनिषा छाजेड यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी मनोगत व्यक्त करताना भाजपाचे नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी स्व. सुरेश काका यांच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, सुरेश काका हे माझ्यासाठी केवळ काका नव्हते, तर माझ्या आयुष्यातील मोठा आधार होते. त्यांच्या अपघाती निधनाने पिपाडा कुटुंबावर मोठा आघात झाला.त्यावेळी तात्काळी गृहमंत्री स्व.आर.आर.पाटील हे देखील रुग्णालयात भेटावयास आले होते. पंचक्रोशीतील असंख्य मित्रमंडळींनाही त्यांच्या जाण्याचे दुःख झाले.

काका आदर्श शेतकरी होते. साई स्नेहबंध ग्रुप व सामाजिक कार्यात ते सक्रिय होते. राहाता येथे रासायनिक खतांच्या विक्रीचे दुकान सुरू करून त्यांनी व्यवसायातही आपला ठसा उमटविला. सामाजिक बांधिलकी आणि व्यवसायातील प्रामाणिकपणा यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता, असे डॉ. पिपाडा यांनी सांगितले.

स्व. सुरेश काका यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची आठवण सांगताना डॉ. पिपाडा म्हणाले, माझ्या राजकीय वाटचालीत काकांचा मोठा सहभाग व आधार होता. नगरपालिका आणि विधानसभा निवडणुकीत ते माझ्यासोबत खंबीरपणे उभे राहिले. वाड्या–वस्त्यांवर पायपीट करून जनतेच्या समस्या समजून घेण्याची त्यांची हातोटी होती. तरुणांशी हसत–खेळत संवाद साधताना ज्येष्ठांचा आदर राखणे, हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते.

> शिर्डी–अहिल्यानगर या रस्त्यावर बळींची जी मालिका आजही सुरु आहे. २०१२ साली आदर्श शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते स्व.सुरेश (काका) पिपाडा यांचेही अपघाती निधन होवुन ते रस्त्याचे बळी ठरले. अखेरच्या घटका मोजत असताना त्यांना रुग्णालयात भेटायला तात्कालीन गृहमंत्री स्व.आर.आर. पाटील हेही भेटायला आले होते. आजही या रस्त्यावरील बळींची मालिका सुरुच आहे. आता हा केवळ रस्ता राहिला नसुन लोकांचे प्राण घेणारा राक्षस झालेला आहे. आम्हालाही आमच्या कुटुंबातील सदस्याला या रस्त्यामुळे गमवावे लागले त्यामुळे कुटुंबातील सदस्य गेल्यावर काय दुख व वेदना होतात याची आम्हाला पूर्णपणे जाणीव आहे त्यामुळे आम्ही पोटतिडकीने या रस्त्याच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा करीत असतो.
>
> **–डॉ.राजेंद्र पिपाडा,भाजपा नेते**

आजच्या धावपळीच्या आणि बदलत्या जीवनशैलीत माणसामाणसांतील संवाद कमी होत चालला आहे. केवळ पैसा असुन माणसे मोठी होत नाहीत तर माणसाकडे माणुसकी व दातृत्व असावे लागते. काहींकडे पैसा असतो परंतु त्यांना सामाजिक व पारिवारीक प्रेम मिळत नाही. पैसा कमवणे हेच ध्येय असते त्यामुळे त्यापलीकडील जगाशी त्यांचा कोणताच संबंध येत नाही.

रक्षाबंधन हा भाऊ–बहिणीच्या प्रेमाचा आणि नात्यांच्या बंधाचा




सण आहे. याच दिवशी स्व. सुरेश काका यांच्या स्मृतींना उजाळा देताना कुटुंबातील नाती अधिक घट्ट करणे, ज्येष्ठांचा सन्मान करणे आणि समाजातील गरजूंच्या मदतीला धावून जाणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या निमित्ताने पिपाडा परिवारातील सर्व मुली या वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती पथावर गेल्या आहे अशा भगिणींचा स्मृतीचिंन्ह देवुन त्याचा सन्मान व गौरव करण्यात आला. यातुन त्यांना पुढील कार्यास प्रेरणा मिळो हा त्यामागील मुख्य हेतु होता.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### रक्ताच्या नात्यापलीकडे माणुसकीची राखी

**लांडेवाडी शाळेत रक्षाबंधनाचा अनोखा सोहळा**



मंचर (समर्थ गांवकरी)

रक्ताच्या नात्यापलीकडे माणुसकीची राखी,राखी म्हणजे फक्त धागा नाही, तर जपलेलं एक सुंदर नातं आहे, या भावनेतून न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी ता.आंबेगाव येथे रक्षाबंधन सोहळा साजरा करण्यात आला. यंदाची संकल्पना आपल्या अदृश्य भाऊ-बहिणींना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा अशी होती.

इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाची जबाबदारी सांभाळत नृत्य, नाट्य, गायन, विविध खेळ व मनोरंजक सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली.विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि आत्म विश्वासामुळे वातावरण आनंदमय झाले.शाळेतील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या लाडक्या 'मामां'चा सत्कार करून त्यांना राखी बांधण्यात आली.सीमा काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.हृदयस्पर्शी उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी एस.एम.जोशी कर्णबधिर मुलांची शाळा, नारोडी येथे भेट देऊन विद्यार्थ्यांना राखी बांधली.या उपक्रमाचे श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी कौतुक केले. कार्यक्रमासाठी प्रशासकीय अधिकारी शामल चौधरी, प्राचार्या शबनम मोमीन व उपप्राचार्य रजनी बाणखेले यांचे मार्गदर्शन लाभले.

### मुंबईतील ३९ बालगृहांतील ६०० हून अधिक भाऊ-बहिणी रक्षाबधनानिमित्र एकत्र

**'टीम अवर चिल्ड्रन्स'चा अनोखा उपक्रम**

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबई शहर आणि उपनगरातील विविध ३९ बालगृहांमध्ये राहणाऱ्या ६०० हून अधिक भाऊ-बहिणींना 'टीम अवर चिल्ड्रन्स'ने रक्षाबंधनानिमित्त एकत्र आणले. सायन येथील श्री मानव सेवा संघ येथे रक्षाबंधन उत्साहात झाले. बालगृहांमध्ये आश्रय घेणाऱ्या बालकांसाठी हा सोहळा केवळ सण साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता, भावंडांमधील प्रेम, आपुलकी आणि कौटुंबिक जिव्हाळा अनुभवण्याचा अनोखा क्षण ठरला. विविध बालगृहांमधून आलेली भावंडे एकमेकांना भेटताच त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला.

या उपक्रमाच्या माध्यमातून बालकांना प्रेम, सुरक्षितता, आपलेपणा आणि एकमेकांच्या सहवासाची जाणीव अनुभवता आली. भावंडांनी एकमेकांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देत हा दिवस आनंदात साजरा केला. 'टीम अवर चिल्ड्रन्स'च्या या उपक्रमामुळे बालकांना कौटुंबिक जिव्हाळ्याच्या भावनेचा अनुभव मिळाला. बालकांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि आनंद हाच या सोहळ्याचा खरा उद्देश व यश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### शोकाकुल वातावरणात पिता-लेकीवर अंत्यसंस्कार;

**रक्षाबंधनाच्या आनंदावर काळाचा घाला**

मंचर (समर्थ गांवकरी)

चाकणजवळील भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या राजेंद्र बंडा भोर (वय ४२) आणि त्यांची १४ वर्षीय मुलगी मयुरी राजेंद्र भोर यांच्या पार्थिवावर शनिवार दि.२९ रोजी पहाटे एक वाजता अवसरी खुर्द येथील वैकुंठभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईकांसह परिसरातील नागरिक उपस्थित होते. रक्षाबंधनासाठी माहेरी निघालेल्या कुटुंबातील पिता-लेकीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने त्यांचे मूळगाव असलेल्या अवसरी खुर्द आणि सद्या कामानिमित्त राहत असलेल्या निरगुडसर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पुणे-नाशिक महामार्गावर चाकण औद्योगिक वसाहतीतील शिंदे गावाजवळ शुक्रवार दि. २८ रोजी सायंकाळी दुचाकी आणि मालवाहतूक ट्रकची धडक झाली. या अपघातात राजेंद्र भोर व मुलगी मयुरी यांचा जागीच मृत्यू झाला, तर पत्नी वैशाली राजेंद्र भोर (वय ३६) गंभीर जखमी झाल्या. त्यांच्यावर चाकण येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.वैशाली यांचे माहेर मिंडेवाडी, ता.मावळ येथे असल्याने रक्षाबंधनानिमित्त त्या भावाकडे निघाल्या होत्या. किंगफा कंपनीजवळ हा अपघात झाला.राजेंद्र हे खाजगी बसवर चालक म्हणून काम करत होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे.मयुरी आठवीत शिक्षण घेत होती. अपघातानंतर ट्रकचालकाने वाहन घटनास्थळी थांबविले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.



मयुरी भोर



राजेंद्र भोर

# विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमी करून मैदानी खेळांकडे वळावे : ॲड. गौरव डुंबरे

## राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

जुन्नर (समर्थ गांवकरी)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब वाघिरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथील जिमखाना विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी ड.गौरव डुंबरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना,विद्यार्थ्यांनी मोबाईल च्या आभासी जगात अधिक वेळ न घालवता मैदानी खेळांना प्राधान्य द्यावे शारीरिक व मानसिकआरोग्या साठी मैदानाचा नियमित वापर करणे आवश्यक आहे. निरोगी व सुदृढ भावी पिढी घडविण्यासाठी खेळ,व्यायाम आणि शारीरिक तंदुरुस्तीला जीवनात विशेष महत्त्व द्यावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट होते अध्यक्षीय मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना खेळा आणि निरोगी रहा असा संदेश दिला.मोबाईलचा स्क्रीन टाइम कमी करून मैदानावर अधिक वेळ व्यतीत केल्यास विद्यार्थ्यांच्या शारीरिक मानसिकसामाजिक विकासाला चालना मिळते. नियमित खेळामुळे शिस्त, आत्मविश्वास,संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनायक कुंडलिक यांनी केले.त्यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व सांगून मेजर ध्यानचंद यांच्या भारतीय क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला. शिक्षणासोबतच खेळ व व्यायाम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त १०० मी., २०० मी., ४०० मी., ८०० मी. व १५०० मी. धावणे, बॅडमिंटन आणि बुद्धिबळया स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.धावण्याच्या विविध स्पर्धांमध्ये राजेश्वरी धुरी, सागर ससाणे, कुनाल कुटे, ओमकार धराडे, चिराग हांडे, यश पानसरे, प्रसाद औटी,शंकर बारे आदी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. बॅडमिंटनमध्ये यश पानसरे व श्रावणी घोलप,तर बुद्धिबळ स्पर्धेत यश अहिनवे*यांनी प्रथम क्रमांक पटकावला.



कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.कल्याण सोनावणे,ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. संजयकुमार रहांगडाले, डॉ. एकनाथ कबाडी,खटउ समन्वयक डॉ. योगेश्वर काळदंते,परीक्षा नियंत्रक डॉ. धनंजय गडगे,डॉ.निलेश काळे,प्रा.सुवर्णा डुंबरे, प्रा. रोहिदास मेमाणे तसेच ज्युनिअर विभागाच्या क्रीडा शिक्षिका सौ.दाते उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सूत्र संचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. उमेश राज पनेरू यांनी केले, तर अर्णव बेनके यांनी आभार मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी जिमखाना विभागातील डॉ. विनायक कुंडलिक, ज्युनिअर विभागाच्या क्रीडा शिक्षिका सौ. दाते तसेच शिक्षकेतर कर्मचारी निखिल काकडे व हरिश्चंद्र वैद्य यांनी विशेष सहकार्य व परिश्रम घेतले.

## मेजर ध्यानचंद हॉकी विश्वातील सुवर्णपान; महादजी शिंदे विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



मेजर ध्यानचंद यांचे जीवन म्हणजे भारतीय हॉकीसाठी समर्पित असे इतिहासातील सुवर्णपान आहे. त्यांच्या अद्वितीय कर्तृत्वामुळेच त्यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांनीही त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उज्वल करण्यासाठी क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळवावे, असे प्रतिपादन श्रीगोंदा तालुका क्रीडा समितीचे सहसचिव तथा क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संदीप बिरंगळ यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन विविध स्पर्धा व उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ होते. यावेळी उपमुख्याध्यापक शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनीता काकडे, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संदीप बिरंगळ, अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी लालकृष्ण मुळे यांनी खेळाचे महत्त्व विशद केले. प्रा. संदीप बिरंगळ यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचा आढावा घेत विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्रात प्राविण्य मिळविण्याची प्रेरणा दिली. सचिन झगडे यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य दिलीप भुजबळ यांनी विद्यार्थी जीवनात अभ्यासाइतकाच खेळालाही महत्त्व असल्याचे सांगत, क्रीडेमुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक आणि सामाजिक असा सर्वांगीण विकास होत असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे आयोजन हर्षवर्धन आगळे व इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी केले. सूत्रसंचालन प्रणव डेबरे याने केले, तर आभार इयत्ता नववी 'ड'चा विद्यार्थी प्रथमेश लोखंडे याने मानले. कार्यक्रमानंतर विद्यालयातील व्हॉलीबॉल संघांदरम्यान रंगलेला प्रेक्षणीय सामना उपस्थितांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. या उपक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## इयत्ता सहावीपासून सुरू झालेला प्रवास जागतिक विजेतेपदापर्यंत; समृद्धी भुजबळची प्रेरणादायी भरारी

**पाचपेक्षा अधिक विजेतेपदांचे करंडक; अबॅकसचे आठही स्तर पूर्ण करून पदवी संपादन**

अकोले (समर्थ गांवकरी)



'जिद्द, मेहनत आणि सातत्याला यशाची साथ मिळते' याचा प्रत्यय कोतूळ येथील डॉ. राहुल भुजबळ यांची कन्या समृद्धी राहुल भुजबळ हिच्या यशस्वी वाटचालीतून येतो. इयत्ता सहावीपासून अबॅकसचे शिक्षण सुरू केलेल्या समृद्धीने आपल्या सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

१६ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय ऑनलाइन अबॅकस स्पर्धेत तिने जागतिक स्तरावरील विजेतेपद मिळविले. विशेष म्हणजे अबॅकसच्या सहाव्या स्तरातील ६० गुणांची प्रश्नपत्रिका तिने अवघ्या ४ मिनिटे १२ सेकंदांत पूर्ण केली.

आजवरच्या प्रवासात समृद्धीने विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होत पाचपेक्षा अधिक विजेतेपदांचे करंडक मिळविले आहेत. अबॅकसचे सर्व आठ स्तर पूर्ण करून तिने पदवी संपादन केली असून सध्या तिची पदव्युत्तर अभ्यासक्रमाकडे वाटचाल सुरू आहे.

अबॅकसच्या सरावातून विकसित झालेली वेगवान आकडेमोड, अचूकता, एकाग्रता, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वास यामुळे समृद्धीने शालेय शिक्षणातही उत्तम समतोल साधला आहे. तिने नुकतेच इयत्ता दहावीचे शिक्षण पूर्ण केले आहे.

तिच्या या यशामागे आय स्किल अबॅकस अकादमीचे संचालक श्री. तनुज पठाडे आणि संचालिका सौ. प्रियांका तनुज पठाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

इयत्ता सहावीपासून सुरू झालेली तिची वाटचाल आज जागतिक व्यासपीठावर पोहोचली असून, समृद्धीचे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## जुडो स्पर्धेत होरायझन अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**प्रिशा मानकर प्रथम, तर युग मानकरने पटकावला तृतीय क्रमांक**

नाशिक (समर्थ गांवकरी)





नाशिक जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नाशिक जिल्हास्तरीय जुडो स्पर्धेत मखमलाबाद येथील मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संचलित होरायझन अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या वयोगटात प्रिशा संतोष मानकर हिने दमदार खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण यश संपादन केले. तसेच १४ वर्षांखालील मुलांच्या वयोगटात युग संतोष मानकर याने उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळविला. दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्य, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले.

या विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक आदेश पाटोळे, प्रतीक लोखंडे व वैशाली मतसागर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना सराव, तंत्रकौशल्य आणि स्पर्धात्मक तयारीमध्ये मोठी मदत झाली.

## महाराजा कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त फुटबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न

**खेळातून शिस्त, संयम आणि व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते : प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे**

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. मार्गदर्शन करताना ते म्हणाले, खेळ हा केवळ बक्षीस जिंकण्यासाठी नसतो, तर खेळामुळे शिस्त, संयम, आत्मविश्वास आणि सुदृढ शरीराची जडणघडण होते. ज्या खेळाडूला शिस्तीचे महत्त्व समजते, तो आपल्या क्षेत्रात यश मिळवल्याशिवाय राहत नाही.

आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी विद्यार्थ्यांसमोर सचिन तेंडुलकर, विनोद कांबळी, हिमा दास आणि पी. टी. उषा यांच्या क्रीडा कारकिर्दीची उदाहरणे देत सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि मेहनतीचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडेलाही आपल्या जीवनाचा महत्त्वपूर्ण भाग बनवावा, असे आवाहन त्यांनी केले.



राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित फुटबॉल स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मैदानावर खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत चुरशीने सामने खेळले.

# हुंडा : आधुनिकतेच्या चेहऱ्यावरचा काळा डाग : ह.भ.प. श्री. विशाल रघुनाथ गडगे, आळेफाटा

(समर्थ गांवकरी)

आपण खरंच आधुनिक झालो आहोत का? गगनचुंबी इमारती, उच्चशिक्षण, लाखोंच्या पगाराच्या नोकऱ्या, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि बदलती जीवनशैली यांना आपण प्रगतीची लक्षणे मानतो. पण लग्नाची बोलणी सुरू होताच मुलाचा पगार, पद, नोकरी आणि त्याच्या बदल्यात मुलीच्या माहेराकडून मिळणाऱ्या पैशांचा हिशेब मांडला जात असेल, तर ही आधुनिकता नेमकी कुठे आहे? विज्ञानाने माणसाला अवकाशात पोहोचवले; मात्र हुंड्याच्या मानसिकतेत अडकलेला समाज अजूनही माणुसकीच्या पायरीवरच उभा आहे. हुंडा हा केवळ पैशांचा व्यवहार नाही; तो स्त्रीच्या सन्मानावर, स्वाभिमानावर आणि समानतेच्या विचारावर केलेला घाला आहे.

काळ बदलला, हुंड्याची भाषा बदलली; पण मानसिकता फारशी बदललेली नाही. मुलासाठी गाडी घेतली तर बरं होईल, नवीन घरासाठी थोडी मदत झाली तर उपयोग होईल, लग्न थाटात झाले पाहिजे, मुलीला एवढे सोने तरी हवेच ही वाक्ये वरकरणी अपेक्षांची वाटली, तरी त्यामागे आर्थिक मागणी दडलेली असते. हुंडा मागण्याची पद्धत बदलली म्हणून त्याचे स्वरूप बदलत नाही. मुलीच्या माहेराकडून आर्थिक लाभाची अपेक्षा असेल, तर तो हुंडाच. विवाह हा दोन जीवांचा सहजीवनाचा संकल्प आहे; त्याला आर्थिक व्यवहार बनवणे म्हणजे नात्याच्या पायातच लोभाची वीट बसवणे होय. त्यात प्रतिष्ठेची स्पर्धा आणि लोक काय म्हणतील? या भीतीची भर पडली की मुलीचे पालक कर्जाच्या ओझ्याखाली दबले जातात.

हुंडा म्हणजे केवळ लग्नाच्या वेळी दिली जाणारी रोकड, दागिने किंवा वस्तू नाहीत. त्याची खरी सुरुवात लग्नानंतर होते. माहेरून काय आणलेस?, तुझ्या आई-वडिलांनी एवढेही केले नाही, आमच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत अशा टोमण्यांतून मानसिक छळ सुरू होतो. पुढे तो आर्थिक नियंत्रण, अपमान, मारहाण आणि सततच्या दबावात बदलू शकतो. संसार टिकवण्यासाठी अनेक महिला गप्प राहतात. मुलांच्या भवितव्याचा विचार करून सहन करतात. काही जणी मदत मागण्याआधीच तुटून जातात. म्हणून हुंड्याचा प्रश्न हा लग्नाच्या खर्चाचा प्रश्न नसून एका स्त्रीच्या सुरक्षित आयुष्याचा प्रश्न आहे. सर्वांत गंभीर बाब म्हणजे हुंड्याची मानसिकता अशिक्षित समाजापुरती मर्यादित राहिलेली नाही. उच्चशिक्षित, मोठ्या पदांवर काम करणारे आणि स्वतःला पुरोगामी समजणारे लोकही तिच्यापासून मुक्त झालेले नाहीत. मुलगा डॉक्टर, अभियंता, अधिकारी किंवा मोठा व्यावसायिक असेल, तर त्याच्या शिक्षणाची आणि कमाईची जणू लग्नाच्या बाजारात किंमत ठरवली जाते. मुलगा शिकला म्हणजे त्याची बोली वाढते का? आई-वडिलांनी केलेल्या शिक्षणाच्या खर्चाची वसुली मुलीच्या माहेराकडून करायची का? शिक्षणाने जर समानता, संवेदनशीलता आणि स्त्रीचा सन्मान शिकवला नसेल, तर त्या शिक्षणाचे मोल तरी काय?

पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणाने २०२५ मध्ये हुंडा आणि कौटुंबिक छळाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला. त्यांच्या मृत्यूनंतर हुंड्यासाठी छळ झाल्याचे आरोप झाले आणि पतीसह सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल झाला. ऑगस्ट २०२६ मध्ये पिंपरी-चिंचवडमधील वाकड परिसरातील शिल्पा गवारे यांच्या मृत्यूच्या प्रकरणातही माहेरच्या संपत्तीत हिस्सा आणण्यासाठी शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला असून तपास सुरू आहे. या घटना केवळ बातम्या म्हणून वाचून विसरण्याच्या नाहीत. त्या आपल्या सामाजिक विवेकाला हादरा देणाऱ्या आहेत. प्रश्न असा आहे की, एखादी महिला मृत्यूच्या उंबरठ्यावर पोहोचल्यानंतरच समाज जागा होणार का? छळ सुरू असताना तिच्या पाठीशी उभे राहण्याची जबाबदारी कुणाची?

घटना घडली की समाज संतापतो. सोशल मीडियावर निषेधाच्या पोस्ट झळकतात, कठोर शिक्षेची मागणी होते आणि काही दिवसांनी सगळे शांत होते. पुढच्या लग्नात मात्र पुन्हा तेच प्रश्न काय देणार? हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ अस्तित्वात आहे; तरीही हुंडा संपत नाही. कारण कायदा गुन्ह्याला शिक्षा देऊ शकतो, पण लोभाची मानसिकता बदलू शकत नाही. त्यासाठी समाजालाच आत्मपरीक्षण करावे लागेल. बदलाची सुरुवात घरापासून झाली पाहिजे. मुलाला शिक्षणाबरोबर स्त्रीचा सन्मान, समानता आणि जबाबदारी शिकवली पाहिजे. मुलीला लग्नासाठी पैसा नव्हे, तर शिक्षण, आत्मविश्वास आणि आर्थिक स्वावलंबन दिले पाहिजे.

प्रत्येक मुलाच्या पालकांनी स्वतःला एक कठोर प्रश्न विचारावा मुलाचे लग्न करतोय की त्याची किंमत वसूल करतोय? आणि प्रत्येक मुलाने विवाहापूर्वीच स्पष्ट सांगावे माझ्या शिक्षणाची, नोकरीची किंवा पदाची किंमत माझ्या होणाऱ्या पत्नीच्या माहेराकडून मला नको. ही भूमिका केवळ एका लग्नाला साधेपणा देणार नाही; ती समाजाच्या विचारांना दिशा देईल.

खरा आधुनिक समाज तो नाही, जो गगनचुंबी इमारती उभ्या करतो; खरा आधुनिक समाज तो, जो आपल्या मुलाच्या लग्नात हुंड्याला दारातच थांबवतो. हुंडा संपवण्यासाठी मोठ्या घोषणा नकोत; प्रत्येक घरात एक ठाम नकार हवा. एका मुलाने हुंडा नाकारला, एका पालकाने मागणी नाकारली आणि एका कुटुंबाने आम्हाला काहीही नको असे ठामपणे सांगितले, तर त्या एका निर्णयातून अनेक घरांचे भविष्य बदलू शकते. कारण हुंडा नाकारणारा मुलगा केवळ लग्न करत नाही; तो अन्यायाच्या जुन्या परंपरेला नकार देऊन समानतेच्या नव्या समाजाची मुहूर्तमेढ रोवतो.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)


लोकसंग्रह, अभ्यासू नेतृत्व, जनसेवेची अखंड
निष्ठा आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांशी
आयुष्यभर जपलेली बांधिलकी
या गुणांचा समन्वय असलेले नेतृत्व म्हणजेच
लोकनेते
नाथाभाऊ
अमृत महोत्सव : १९५२ - २०२६
शुभारंभ व सत्कार सोहळा
सेवाव्रतीच्या अमृतपर्वाचा अभिवादन सोहळा...
अमृत महोत्सवी सोहळा :
रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६
वेळ : सकाळी १० वाजता
मा.आ. एकनाथराव खडसे
अमृत महोत्सव
कार्यक्रमाचे स्थळ :
श्री संत मुक्ताई जुने मंदिर, कोथळी,
ता. मुक्ताईनगर, जि.जळगाव
- विशेष उपस्थिती -
मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
- विशेष उपस्थिती -
मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब
राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.गट)
- सन्माननीय अतिथी -
मा.श्री.हरिभाऊ बागडे
मा.राज्यपाल, राजस्थान
मा.श्री.नितीन गडकरी
केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग
मा.श्री.एकनाथजी शिंदे
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्रीमती सुनेत्राताई पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.रामदास आठवले
केंद्रीय राज्यमंत्री, सामाजिक न्याय
मा.श्री.उध्दव ठाकरे
शिवसेना प्रमुख (उबाठा गट)
मा.श्री.प्रतापराव जाधव
केंद्रीय राज्यमंत्री, आयुष मंत्रालय
मा.श्रीमती रक्षा खडसे
केंद्रीय राज्यमंत्री, युवा कल्याण व क्रीडा
मा.श्रध्देय बाळासाहेब आंबेडकर
राष्ट्रीय अध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी
मा.श्री.विनोद तावडे
राष्ट्रीय सरचिटणीस, भाजपा
मा.श्री.सुधीर मुनगंटीवार
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.शशिकांत शिंदे
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, श.प.गट
मा.श्री.रावसाहेब दानवे पाटील
माजी केंद्रीय मंत्री
मा.श्री.चंद्रशेखर बावनकुळे
महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.चंद्रकांत पाटील
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, म.रा.
मा.श्री.दादाजी भुसे
शालेय शिक्षण मंत्री, म.रा.
मा.श्री.उदय सामंत
उद्योग मंत्री, म.रा.
मा.छगन भुजबळ
अन्न व नागरी पुरवठा मंत्री, म.रा.
मा.श्री.गुलाबराव पाटील
पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री, म.रा.
मा.श्री.गिरीष महाजन
जलसंपदा मंत्री, म.रा.
मा.पंकजा मुंडे
पर्यावरण, पशु - संवर्धन मंत्री, म.रा.
मा.श्री.आकाश फुंडकर
कामगार मंत्री, म.रा.
मा.श्री.संजय सावकारे
वस्त्रोद्योग मंत्री, म.रा.
मा.श्री.जयंत पाटील
माजी प्रदेशाध्यक्ष, रा.काँ.
मा.श्री.दिलीप कांबळे
वस्त्रोद्योग मंत्री, म.रा.
मा.श्री.हर्षवर्धन सपकाळ
महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, राष्ट्रीय काँग्रेस
मा.श्री. राजेश पाटील विभाग संघचालक, रा.स्व.संघ
प्रमुख उपस्थिती
मा.श्रीमती अर्चनाताई चिटणीस
माजी मंत्री, मध्यप्रदेश
मा.श्री.बाळा नांदगावकर
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.जयंत पाटील
अध्यक्ष, शे.का.प.
मा.श्री.सुरेशदादा जैन
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.अशोकभाई जैन
उद्योजक, जळगाव
मा.श्रीमती स्मिता वाघ
लोकसभा सदस्य, जळगाव
मा.श्री.भास्कर भगरे
लोकसभा सदस्य, दिंडोरी
मा.डॉ.अमोल कोल्हे
लोकसभा सदस्य, शिरुर
मा.श्री.निलेश लंके
लोकसभा सदस्य, अहिल्यानगर दक्षिण
मा.श्री.दिलीप वळसे पाटील
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.अनिल देशमुख
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.राजेश टोपे
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.राजेंद्र शिंगणे
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.हर्षवर्धन पाटील
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.महादेवराव जानकर
संस्थापक, रा.स.प.
मा.श्री.संजय कुटे
आमदार, जळगाव जामोद
मा.श्री.नारायणबापू पठारे
आमदार, वडगाव शेरी
मा.श्री.अभिजीत पाटील
आमदार, माढा
मा.श्री.संजय गायकवाड
आमदार, बुलढाणा
मा.श्री.चैनसुख संचेती
आमदार, मलकापूर
मा.श्री.ज्ञानेश्वर पाटील
खासदार, ब्ऱ्हाणपूर
मा.श्री.अंबादास दानवे
विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.किशोरअप्पा पाटील
आमदार, पाचोरा
मा.ॲड.उज्ज्वल निकम
राज्यसभा सदस्य
मा.सौ.श्वेता महाले
आमदार, चिखली
मा.श्री.सुरेश भोळे
आमदार, जळगाव
मा.श्री.चंद्रकांत सोनवणे
आमदार, चोपडा
मा.श्री.अमोल जावळे
आमदार, रावेर
मा.श्री.अनिल पाटील
आमदार, अमळनेर
मा.श्रीमती मंजुश्री दिदी
आमदार, नेपानगर (मध्यप्रदेश)
मा.श्री.अमोल पाटील
आमदार, पारोळा
मा.श्री.सत्यजित तांबे
विधानपरिषद सदस्य
मा.श्री.किशोर दराडे
विधानपरिषद सदस्य
मा.श्री.मंगेश चव्हाण
आमदार, चाळीसगाव
मा.श्री.नंदकिशोर महाजन
विधानपरिषद सदस्य
मा.श्री.चंद्रकांत पाटील
आमदार, मुक्ताईनगर
- आपले स्नेहांकित -
श्री. अरुणभाई गुजराथी ( स्वागत अध्यक्ष )
प्रा.डॉ. सुनिल नेवे ( सचिव )
सौ. मंदाकिनी एकनाथराव खडसे
माजी अध्यक्षा, महानंदा दूध फेडरेशन
श्रीमती रक्षा निखिल खडसे
केंद्रिय युवा विकास व क्रीडा मंत्री
सौ. शारदा गिरीश चौधरी
अध्यक्ष, नाथ फाउंडेशन
ॲड. रोहिणीताई खडसे-खेवलकर
रा.काँ. महिला प्रदेशाध्यक्ष (श.प.गट)
चि. गुरुनाथ निखिल खडसे
कु. क्रिशीका निखिल खडसे
मा.आ.श्री. एकनाथराव खडसे अमृत महोत्सवी समिती